**<u>MHAU070009622025</u>**

<u>वादी तर्फे सा.क्र.१</u>

<u>नि.दि.दावा क्रमांक १९७/२०२५</u>

<u>निशाणी क्रमांक ४७ लगत</u>

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र.४ तर्फे विधीज्ञ श्री.जी.ए.निंबाळकर यांच्या मार्फत शपथेवर सुरु-</u>**

माझे शिक्षण झालेले नाही. मला सही करता येत नाही. वडील वारले त्यावेळी मी लहान होतो. त्यामुळे मला ते कधी वारले हे आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यांचे मृत्युचे प्रमाणपत्र दाव्यात दाखल केलेले नाही. माझया वडीलांना वारस म्हणुन पत्नी व दोन मुले आहेत, मुलगी नाही. साक्षीदाराला प्रश्न विचारला की, शामु भास्कर भाकरे कोण आहे, साक्षीदार सांगतात त्या नावाची व्यक्ती मीच आहे. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यामध्ये वारस प्रमाणपत्र दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, दाव्याच्या निशाणी क्र.१ मध्ये दावा मिळकतीच्या संदर्भाने वंशावळ नमुद केलेली नाही.

हे म्हणणे खरे नाही की, दाव्यामध्ये नमुद केलेली गट क्र.२८० मधील सर्व जमीन म्हणजेच ५ हेक्टर १७ आर शेत हे माझया मालकीचे नाही. हे म्हणणे खरे आहे की, ७/१२ उताऱ्यावर दावा मिळकतीचे ताबेदार व भोगवटदार म्हणुन सहा लोकांची नावे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यामध्ये शामु भास्कर भाकरे, उबेर उल्लाह अब्दुल लतीफ अन्सारी हे पक्षकार केलेले नाही. दावा मिळकती व्यतीरीक्त अजुन कोणत्याही वडीलोपार्जीत जमीनी अथवा घरे नाहीत. आज रोजी मी गावामध्ये राहतो. हे म्हणणे खरे नाही की, राहते घर हे वडीलोपार्जीत आहे.

हे मला माहीत नाही की, पुर्वी गंगापूर तहसील कार्यालय जळाले होते व त्यामुळे जुनी कागदपत्रे जळालेली आहेत. प्रतिवादी क्र.५ यांनी प्रतिवादी क्र.४ यांची बेकायदेशीर फेरफार नोंद घेतली याबाबत मी वरीष्ठांकडे अपील केलेले नव्हते.

हे म्हणणे खरे नाही की, सन १९५९ रोजी माझे वडीलांनी दावा मिळकतीपैकी १ हेक्टर २२ आर इतकी जमीन प्रतिवादी क्र.४ किसन काळे यांना विक्री केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर विक्रीला त्यावेळी माझे आई व भाऊ यांनी संमती दिलेली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर जमीनीमध्ये प्रतिवादी क्र.४ हे सन १९५९ सालापासुन विविध प्रकारची पिके घेतात. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.४ हे बटाई द्वारे शेती कसतात. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.४ यांच्या बटाईदाराला आम्ही दमदाटी करतो.

हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.४ यांची जमीन रस्त्याला लागुन आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमची जमीन प्रतिवादी क्र.४ च्या पाठीमागील बाजुस आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या शेतावर जाण्याकरीता ४ कि.मी लांब रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या हिस्याच्या शेतात जाण्याकरीता प्रतिवादी क्र.४ यांना मी रस्त्यासाठी विनंती केली होती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.४ हे मला रस्ता देण्यास तयार होते परंतु त्यांनी रस्त्याच्या बदल्यामध्ये जागा मागीतली होती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.४ यांच्या मागणीप्रमाणे मी बदली जागा देण्यास तयार नव्हतो, त्यामुळे प्रतिवादी क्र.४ हे आम्हाला रस्त्यासाठी जागा देत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.४ हे रस्त्यासाठी जागा देत नाही या कारणाने रागाने मी सदरचा दावा दाखल केला आहे.

मी प्रतिवादी क्र.४ हे माझया ताब्याला अडथळा करतात म्हणुन त्यावेळी संबंधीत पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली नाही. मी सदरची तक्रार न्यायालयात दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा दावा दाखल करण्यास कारण घडलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ व २ माझयासोबत राहतात. साक्षीदार पुन्हा सांगतो की, वेगवेगळे राहतात. हे म्हणणे खरे आहे की, महाराष्ट्र शासनाला पक्षकार केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.४ यांनी आमच्या विरुध्द दिवाणी दावा क्र.१८७/२०१७ हा मनाई हुकुम मिळण्याकरीता दाखल केला आहे व तो दिवाणी न्यायाधीश क. स्तर यांच्या

न्यायालयात प्रलंबीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी मुदतबाहय दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दाव्याला कोणतेही कारण नसतांना दावा दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

**प्रतिवादी क्र. १ ते ३ व ५ पुकारता गैरहजर, सबब उलटतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

Digitally signed by NILESH RAJARAM INDALKAR
Date: 2026.04.15 15:19:03 +0530

दिनांकः- १५.०४.२०२६

(निलेश रा. इंदलकर)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
गंगापूर